# अवयवदानामुळे मिळाले तिघांना जीवदान

## यकृत व दोन मूत्रपिंड केली दान



**मुंबई (प्रतिनिधी) :** नानावटी रुग्णालयात मेंदू मृत झालेल्या एका व्यक्तीच्या कुटुंबाने मृत व्यक्तीचे यकृत व दोन मूत्रपिंड दान केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे अनेक वर्षांपासून अवयवांच्या प्रतीक्षेत असणाऱ्या तिघांना जीवदान मिळाले आहे. २०१६ या नवीन वर्षातील हे पहिले कॅडेव्हर डोनेशन (मृत व्यक्तीचे अवयव अन्य गरजू व्यक्तीला दान करणे) आहे. मुंबईत मागील वर्षी ४२ वेळा कॅडेव्हर डोनेशन करण्यात आले आहे. यात ३७ यकृत, ७२ मूत्रपिंड व पाच हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करून गरजू रुग्णांना नवे आयुष्य मिळाले आहे. त्यामुळे आता नवीन वर्षातही अवयवदान करण्याबाबत लोकांमध्ये जागरूकता कायम असल्याचे चित्र दिसून येत आहे.

२१ वर्षीय तरुणाला अपघात झाल्याने त्यांच्या मेंदूला गंभीर दुखापत झाली होती. उपचारांसाठी त्याला नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पण मेंदूत अंतर्गत रक्तस्राव झाल्याने ११ नोव्हेंबरला त्याचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूची बातमी नातेवाईकांना दिल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना अवयवदान करण्यास परवानगी मागितली. आपल्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचे अवयव अन्य गरजू व्यक्तींना नवे जीवनदान ठरू शकते, असा विचार करून लगेच मृताच्या नातेवाईकांनी अवयवदानाला परवानगी दिली. परवानगी मिळताच डॉक्टरांनी विभागीय प्रत्यारोपण समन्वय समितीला (झेडटीसीसी) माहिती दिली. त्यानुसार तिचे यकृत व मूत्रपिंड दान करण्यात आले.

यकृत ग्लोबल रुग्णालयातील एका ५१ वर्षीय व्यक्तीला देण्यात आले. एक मूत्रपिंड नानावटी रुग्णालयातील ४८ वर्षीय व्यक्तीला तर दुसरे मूत्रपिंड लीलावती रुग्णालयातील ३८ वर्षीय व्यक्तीला देण्यात आले. यामुळे तीन जणांना जीवदान मिळाले आहे, अशी माहिती नानावटी रुग्णालयातील प्रत्यारोपण विभागाचे समन्वयक यांच्याकडून मिळाली.